# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/08/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 07 कि. मी. अंतरावरील मौजा वाठोडा पाणि फिल्टर जवळ येथे दिनांक 11/08/2021 चे 21:30 वा. दरम्यान आरोपी/मृतक नामे– नितेश वामन सरपाते, वय 27 वर्ष, रा. रोधीता नागभीड जि चंद्रपुर हे दि 11/08/2021 रोजी सायंकाळी 19.30 वा सुमारास त्याचे एमएच– 40/बीएच– 1023 क्रमांकाच्या मोटरसायकलनी डबल सिट त्याचा मित्र साहील चाफेकर यास बसवुन स्वता गाडी चालवित बुटीबोरी येथुन सोनेगाव येथे जात होता. त्यादरम्यान समोरून जाणारा वाहणाला ओव्हरटेक केल्याने त्याचे मोटरसायकलचे संतुलन बिघडल्याने त्याची मोटरसायकल रोडच्या डिव्हायडरला जावुन आडळली. या अपघातात त्याला डोक्याला मार लागल्याने त्यास उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दि. 16/08/2021 रोजी 08.15 वा. त्याचा मृत्यु झाला. मृतक/आरोपी हा स्वतःहा अपघात करण्यास व स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे राजेश माकडे मेडीकल पोलीस बुथ नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक सतीश सोनटक्के हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील मौजा रूईखैरी येथे दिनांक 11/08/2021 चे 18:30 वा. दरम्यान आरोपी/मृतक नामे– नितेश मुरलीधर ठाकरे, वय 29 वर्ष, रा. सोनेगाव बोरी हा त्याचे एमएच– 40/बीआर– 4818 क्रमांकाच्या मोटरसायकलने जात असता मौजा खैरी गावाजवळ त्याच्या ताब्यातील मोटरसायकल स्लिप झाल्याने त्याचा डोकयाला मार लागला. तो जखमी झाल्याने त्याला उपचाराकरीता प्रथम माया हॉस्पीटल बुटीबोरी व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दि. 14/08/2021 रोजी 16.30 वा. उपचार दरम्यान त्याचा मृत्यु झाला. मृतक आरोपी हा स्वताहा अपघात करण्यास व स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संतोष ठाकुरदास दधहरे, वय 32 वर्ष, रा. गिटीखदान, प्लॉट क्र. 121 प्रशांत कॉलनी गोरेवाडा रोड, नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री भारती 8329306178 हे करीत आहे.

.

.

.

.

.

.

. अपहार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर बोरखेडी टोलनाका जवळ येथे दि. 30/06/2021 ते दि. 07/07/2021 चे 15.00 वा. सुमारास आरोपी नामे– फैज अहमद चौधरी, वय 31 वर्ष, रा. हरियार घाट पीएस कातलीचीरा हालकी, हलाकांडी आसाम हा ड्रायव्हर असून याने फिर्यादी नामे– संतोश ठाकुरदास दधहरे, वय 32 वर्ष, रा. गिटीखदान प्लॉट क्र 121 प्रशांत कॉलनी गोरेवाडा रोड, नागपुर याच्या कंपनीचे कंटेनर क्र पीबी– 13/एआर–4742 ने कोचीन केरला येथुन ओपोलो कंपनीचे टायर टयुब सह 202 नग आपले ट्रक/कंटेनर मध्ये भरून कोचीन वरून नागपूर येथे घेवुन जात असतांना कोठेतरी रस्त्यात त्यापैकी 14 टायर टयूब नग कि 1,74,160/–रू. चा टायर टयुब अपहार करून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 407 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भारती 8329306178 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 5 कि.मी अंतरावरील मारोडी येथे दि. 13/08/2021 चे 08.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– अखिलेश इंद्रमणी मिश्रा वय 37 वर्ष रा. प्लॉट नं. 36 नेताजी सोसायटी मानकापुर नागपुर हा खापा वरून नागपुरला दारूच्या नशेत त्याच्या मोटरसायकलने येत असता एका अज्ञात इसमाला विश्वासात घेवुन सोबत घेवुन आला तेव्हा त्या इसमाने मारोडी गावात मोहाफुल दारू मिळते म्हणून मारोडी मध्ये थांबुन फिर्यादीस दारू घेण्यास पाठविले. यानंतर अज्ञात इसमाने त्याच्या मित्राला फोन करणेकरीता फिर्यादीला त्याचा मोबाईल मागितला. फिर्यादी हा दारू आणायला गेला असता त्या अज्ञात इसमाने फिर्यादीचा मोबाईल किमती 10,000/–रु. व एमएच– 31/एफजे–4220 क्रमांकाची मोटरसायकल कि 30,000/–रु. असा एकुण कि. 40,000/–रु. चा मुद्देमाल घेवुन जावुन विश्वासघात केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 406 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री सोनेकर 8208335194 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर